# राशिभविष्य - सप्टेंबर, २०१८.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा, असे वाटते. तसे असल्यास कोणी काही समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर तो अपमान वाटून असह्य मनस्ताप होत असावा, असे वाटते. या राशीची लहान मुले तर अतिशय व्रात्य, हूड, खोडकर झाली असावी, असे वाटते. हे सर्व हर्षलच्या प्रभावामुळे घडत असते. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यास उपयुक्त असून असे कार्यक्षेत्र असणारांना नक्कीच प्रगतिकारक होईल. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होणार आहे. त्यामुळे नोकरीत जे काय साध्य करावयाचे ते त्यांनी महिन्याच्या उत्तरार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. कार्यसिद्धी करण्यास बुध ग्रह अनुकुल आहे. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. शिवाय संततिविषयक समस्याही त्रस्त करण्याची शक्यता दिसते. नातेवाईक मंडळीपासून दुरावा निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी गुरु-शुक्र हे शुभ ग्रह असल्याने वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. काहीना विवाहयोग येईल.

प्रेमिकांचे प्रेमसंबंध दृढ होतील. नवे स्नेहसंबंध निर्माण होणेही संभवते. ज्या स्त्रियांचा या महिन्यात प्रसूतिकाळ आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. काहीना प्रवासाचे योग येतील. पण या राशीच्या दशम स्थानी असणाऱ्या मंगळ-केतुमुळे व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. काही मंडळीना कामाचा असह्य ताण सहन करावा लागेल. नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. काहीना हातचे सोडून नवे काही करावेसे वाटेल. पण त्यांनी तसे करू नये . आहे ती नोकरीच करावी. आर्थिक नुकसान होणे संभवते. काहींना कुमार्गी मित्राचा त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “श्रीगणपति अथर्वशीर्षाचे “ पठण करा.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंग, जिवावरचे प्रसंग, निर्माण होणे संभवते. प्रिय व्यक्तीशी शत्रुत्व निर्माण होईल. काहींच्या चारित्र्याला धक्का बसणेही संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेला राहू अनुकुल असला तरी तो बंधुसुखात बाधा निर्माण करीलसे दिसते. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून

अनारोग्यकारक असाच आहे. शिवाय कौटुंबिक त्रास सहन करावे लागणे, नियोजित कार्यात अडथळे , अडचणी, दिरंगाई निर्माण होणे , अकारण खर्च करावा लागणे, नोकरीत वरिष्ठ अधिकाऱ्याचा त्रास सहन करावा लागणे, मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करणे, प्रिय जनांपासून फारकत होणे, अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे नैराश्य येणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले गुरु-शुक्र हे शुभ ग्रह बौद्धिक व कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक लाभदायक होतील. काहींचे प्रेमसंबंध जुळून येतील तर काहींचे नवे स्नेहसंबंध जुळून येतील. पण काही मंडळींची योग्यता व कर्तृत्व असूनही त्यांना आपले कर्तृत्व सिद्ध करण्यास संधीच मिळत नाही अशी अवस्था होणे संभवते. उलट नको ते आळ येण्याचीच शक्यता दिसते. अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे अपेक्षाभंग होणे, अनारोग्य होणे, असमाधानकारक घटना घडणे संभवते. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. केतूमुळे संततिसुखात बाधा येणे शक्य दिसते. मानसिक रोग तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा. दररोज नियमितपणे "ओम नम:शिवाय " मंत्राचा एक माळ जप करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती प्रतिकुल होणे संभवते. काही मंडळीना बढती काहींना पगारवाढ तर क्वचित कोणास एखादे उच्च पद किंवा मानाचे स्थान असे काही मिळण्याची शक्यता संभवते. जपा. पण छुप्या हितशत्रूपासून धोका असून मनस्ताप दिला जाणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. पण या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या गुरु-शुक्र या शभ ग्रहांमुळे सतत मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपापल्या कलाविश्वात प्रगती करणे शक्य होईल. त्यामुळे सात्विक सुखसमाधान मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना व कलात्मक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक व कलात्मक प्रगती करणे सहज शक्य होईल. या राशीच्या ज्या स्त्रियांचा प्रसूतिकाल या महिन्यात आहे त्यांना पुत्रप्राप्ती होणे संभवते. शनि ग्रह वकिली व्यवसाय असणारांना व कायदा विषयक शिक्षण घेत असणारांना अनुकुल होईल व सहज प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेले मंगळ-केतू प्रतिकुल व अनारोग्यकारक असून या राशीच्या काही मंडळीना उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. काहीना मूळव्याधीसारखे आजार त्रस्त करतील. काही मंडळींना त्वचारोगाचा तर काहींना

रक्तविकाराचा आजार त्रस्त करील. छोटे मोठे अपघात होणे संभवते. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा.

अपघात भय आहे. कौटुंबिक जीवनात वाद, गैरसमज अशापैकी कारणानी मनस्ताप होण्याची शक्यता आहे. जपा. अध्यात्मात रस असेल त्यांना त्यासाठी काळ अनुकुल आहे. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील; तर काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. मित्रांशी भांडणे होतील. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " गणपति अथर्वशीर्षाचे " व "श्रीहनुमानचालिसा " स्तोत्राचे पठण करा.

(४) **कर्क -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होणार आहे. महिन्याच्या पूर्वार्धात गैरसमज, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच धनप्राप्ती होणार असली तरी वाढता खर्च, होणारे आर्थिक नुकसान, पूर्ण करावयाच्या आर्थिक जबाबदाऱ्या, अनारोग्य, नोकरीतील प्रतिकुल परिस्थिती अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत काही प्रमाणात बदल होईल. रवि-बुध या राशीच्या तृतीय स्थानी गेल्यावर नोकरीत अनुकुल परिस्थिती निर्माण होईल. काही मंडळीना वेतनवाढ मिळेल, काहीना बढती मिळू शकेल. जन्मकुंडलीत योग असेल तर क्वचित कोणास एखादे उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळण्याची शक्यता दिसते. पण हितशत्रूंचा त्रास होण्याची शक्यता आहे. जपा. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र, वकिली, सल्लागारी व्यवसाय, कोळसा, लोखंड व्यापारी, असे व्यवसाय असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शुभ ग्रह गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील . शेतीवाडी असणारांना त्यापासून अपेक्षित लाभ होईल. पण नातलगांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाणे संभवते. जपा. मात्र सप्तम स्थानी असलेल्या मंगळ-केतूमुळे जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, गैरसमज अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशयाने किंवा अन्य कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. जलभय, विष भय असल्याने जलप्रवास करू नका. तसेच उघड्यावरचे आरोग्यास हानिकारक असणारे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा. "ओम नम:शिवाय" मंत्राचा एक माळ जप दररोज नियमितपणे करा.

(५) **सिंह -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडल्यास शारीरिक

अनारोग्यबरोबरच मानसिक अनारोग्य होणेही संभवते. काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. चंचल, अस्वस्थ मनस्थितीत मित्रद्रोह, अविचाराचे आचरण होणे संभवते. जपा. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर सतत मन व विचारशक्ती शांत राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. काही मंडळीना गलितगात्र असा थकवा येणे संभवते. काहींना नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात थोडा धनलाभ होणे संभवते. या राशीच्या लेखकांना आपले लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित झाल्याचे समाधान मिळेल. कुटुंबात शुभ घटना घडतील. सुखसमाधान लाभेल. काही मंडळीना भूमिलाभ तर काहींना धन-मान- प्रतिष्ठा यापैकी काहीतरी मिळण्याची शक्यता दिसते. प्रवासाचे योग संभवतात. व्यापारी मंडळींना स्त्री - ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या शास्त्रीय संशोधनात्मक शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, वकिली, सल्लागारी व्यवसाय, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होईल. पण त्यासाठी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, इजा होणे, फोड येणे, रक्तविकार बळावणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. तसेच वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासाची तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल.

श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. सतत मनाविरुद्ध घटना घडणे, मानहानी होणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे, मनस्थिती सतत अस्वस्थ, चंचल राहणे, आर्थिक चिंता सतावणे, त्यामुळे नैराश्य येणे, कुसंगतीची बाधा होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. हृदयविकार, रक्तविकार असे आजार असलेल्यांनी विशेष काळजी घेतली पाहिजे. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे विविध कारणांनी गृहसौख्यात बाधा येणे संभवते. पंचम स्थानी असलेल्या मंगळ-केतूमुळे मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाची आचरणविषयक समस्या, स्थावर संपत्ती बाबतचा त्रास, माता असल्यास तिचे आजारपण अशा अनेक घटना घडण्याची शक्यता असल्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ काही प्रमाणात अनुकुल होणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या

शैक्षणिक प्रगतीत अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. आरोग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळीना काल्पनिक चिंता सतावतील; तर काहींना आपल्याला कसला तरी आजार झाला आहे या विचाराने अस्वस्थपणा येईल. काहींना फसवणूक झाल्याचा त्रास सहन करावा लागेल. अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. नियंत्रित वेगाने वाहन चालवा, अधिकारपदाचा दुरुपयोग करून वाममार्ग धन मिळविण्याचा प्रयत्न अंगाशी येईल. जपा. अशा एकूण प्रतिकुल परिस्थितीत धनस्थानी असलेल्या गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील, आर्थिक लाभ होतील, व काही प्रमाणात होणारा मनस्ताप सुसह्य होईल. श्रद्धा असेल तर दुर्गा देवीची उपासना करा.

**(७) तुळा -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, आनंददायक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. म्हणून जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा अटोकाट प्रयत्न करा. अनुकुल काळात काहींना बढती, पगारवाढ, काहींना अधिकारपद तर क्वचित कोणास एखादे मानाचे स्थान वा उच्च पद मिळणे संभवते. तसेच नवे मित्र मिळणेही संभवते. सध्या या राशीच्या मंडळीची मानसिक स्थिती अत्यंत भावनाशील झाली असावी, असे दिसते. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात सर्वच बाबतीत प्रतिकुल व मनस्ताप देणारे घडण्याची शक्यता असल्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे या राशीच्या काही युवकांना नवी मनपसंत अशी नोकरी मिळेल. काहींना आवडते असे नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण याच शनि ग्रहामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. अध्यात्माची मनापासून आवड असणारांना उपासनेद्वारे मानसिक उन्नती करणे शक्य होईल. तसेच गूढ संशोधनाची आवड असणारांना त्यात प्रगती करणे शक्य होईल. हर्षलमुळे जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, दोघांतील वाद, गैरसमज अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. गृहसौख्य स्थानी असलेल्या मंगळ-केतू ग्रहांमुळे असमाधानकारक घटना घडणे, वाद, भांडणे होणे व गैरसमज होणे, एकमेकाशी न पटणे संभवते. त्यामुळे गृहसौख्य मिळणे अशक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती प्राप्त होईल. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(८ ) वृश्चिक -** या राशीच्या धनस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच हा शनि आर्थिक समस्या निर्माण करून त्रस्त करतो. आर्थिक संकटे आणतो. जे आधीच कर्जदार आहेत त्यांच्या कर्जात वाढ होणेही शक्य असते. या राशीच्या तृतीय स्थानी असलेले मंगळ व केतु अनुकुल असून येथील मंगळामुळे धैर्य प्राप्त होईल, हिम्मत वाढेल, महत्त्वाकांक्षा निर्माण होईल , हातून काही कर्तृत्व घडेल, प्रवासाचे योग येतील. पण या मंगळामुळे इजा होणेही संभवते. जपा. केतुमुळे या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्रीग्राह्कांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. हा केतू असह्य असे मानसिक दु:ख देणारा असल्यामुळे मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासनेत मन गुंतवा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. अशा उपासनेने हा केतु अनुकुल होतो. या राशीच्या मंडळींनी सतत अति विचारात मग्न राहू नये. कारण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे त्यांना डोकेदुखीचा किंवा मेंदूविकाराचा आजार होणे संभवते. जपा. काही मंडळींना ताप येणेही शक्य आहे. जपा. परंतु येथील हर्षल चिकित्सक बौद्धिक आणि शास्त्रीय संशोधन कार्यात मग्न असलेल्यांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. भाग्यस्थानी असलेल्या राहूमुळे प्रवासयोग येतील. मोठ्या लोकांच्या ओळखी होतील. लाभस्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे सतत मनोनुकुल घटना घडतील. सुख समाधान लाभेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांना व्यवसायात वाढ करणे शक्य होईल. बुध ग्रहामुळे मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ, मित्रलाभ होणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या गुरु-शुक्र या शुभ ग्रहांमुळे सुखसमाधान लाभेल; पण गुरु ग्रहामुळे अध्यात्म, समाजकार्य करीत असणारांना प्रगती करणे शक्य होणार असले तरी कौटुंबिक त्रास होणे, अपेक्षाभंग होणे, प्रवासात त्रास होणे अशापैकी घटना घडणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीमहालक्ष्मी देवीची आराधना करा. “महालक्ष्मी स्तोत्रा”चे पठण करा.

**(९) धनु -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे. या शनि ग्रहामुळे या महिन्याच्या काळात स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ होईल व गहरे नैराश्य येईल. जपा. या राशीच्या धनस्थानी असलेल्या मंगळ व केतूमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील. अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण करावयाच्या याची चिंता अस्वस्थ करील. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. घसा, मान, दाढा, डोळे यापैकी कशाचे तरी अनारोग्य त्रस्त करील. गुढविद्या, अध्यात्म यांत रस असणारांना काळ

अनुकुल होईल व आध्यात्मिक साधनेत व गूढ संशोधन कार्यात प्रगती होईल. तसेच बौद्धिक कार्यास अनुकुल असणाऱ्या पंचम स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे कलाकारांना कलाविष्कार करणे सहज शक्य होईल. उच्च बौद्धिक व संशोधनात्मक कार्यात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेला राहू अनुकुल असल्यामुळे सुखसमाधान लाभेल. तसेच अचानक धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत या महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. मानसिक ताण, विरोध, पदावनती, अनारोग्य अशापैकी घटना घडणे संभवते. पण माहिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती पूर्णपणे बदलेल आणि सर्व काही सुखकारक असे घडेल. इच्छा पूर्ण होईल. नियोजित कार्यात यश मिळेल., धनलाभ होणेही शक्य आहे, तसेच मोठ्या ओळखी लाभदायक होतील. बुधामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या गुरु-शुक्र या शुभ ग्रहांमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. मन:शांती लाभेल व सर्व सुखसमाधान मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम स्थानी मंगळ- केतू असल्याने व मकर राशी मंगळ ग्रहाची उच्च राशी असल्याने या राशीच्या मंडळींचा स्वभाव मंडळींचा हटटी ,मानापमान फार असणारा असा असल्यामुळे अकारण शरीरपीडा , दगदग होईल व त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. पण केतूच्या गुलहौशी व ऐशारामी स्वभावामुळे फारशी दगदग होणार नाही व त्यामुळे फारसे अनारोग्यही होणार नाही. पण या केतूमुळे व्यापारी मंडळीना या स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. शिवाय हा केतू धोकेबाज असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा, वाहन सावधानतेने व नियंत्रित वेगाने चालवा. धनस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतीलसे दिसते. तसेच आर्थिक जबाबदाऱ्या कशा पूर्ण होणार याची चिंता त्रस्त करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षल ग्रहामुळे कशातही सुखसमाधान लाभणार नाही. आहे त्या परिस्थितीत चैन पडणार नाही. कोणाशी पटणार नाही. तसेच या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ प्रतिकुल असून नोकरीत कामाचा ताण, विरोध, काहींना पदावनतीमुळे होणाऱ्या अपमानाचे दु:ख, अशा अनेक मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे संकट परंपरा व मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. अशा परिस्थितीत शुक्रामुळे नव्या अडचणी व दु:ख देणाऱ्या घटना घडणे संभवते. पण शुभ ग्रह गुरुमुळे बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत

असणारांनाच केवळ काळ अनुकुल होईल व त्यांनाच मानसन्मान, वरिष्ठांकडून होणारे कौतुक, प्रशंसा आदि मनोनुकुल अनुभव येतील. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीची मनस्थिती अतिशय कोमल झाली असून मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असतील असे वाटते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले की लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे शत्रूवर विजय मिळवू शकाल. ज्यांचा इतर जातिधर्माच्या लोकांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होतील. पण काहींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. तसेच या राहूमुळे विषभय असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होईल.; पण सतत स्वत:चे अनारोग्य, कामात येणारे अडथळे किंवा अपयश, होणारा विरोध अशापैकी कारणांनी मनस्ताप सहन करतच काळ व्यतीत करावा लागेल. शिवाय काही मंडळीना संततिविषयक समस्याही त्रस्त करतीलसे वाटते. यांत्रिक तांत्रिक नोकरी व्यवसाय असणारांना, तसेच कोळसा, लोखंड व्यापार असणारांना काळ थोडा अनुकुल व लाभदायक होईल. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने प्रवास योग येतील, अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शक्ती प्राप्त होईल, अध्यात्मात प्रगती होईल. काहींना गुरुकृपा तर काहींना थोर कृपा प्राप्त होईल. सज्जनांचा सहवास लाभेल. काही मंडळीना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या व्ययस्थानी असलेले मंगळ-केतू हे दोन्ही ग्रह प्रतिकुल असून त्यांच्यामुळे आर्थिक चिंता, भांडणे, मानहानी, अस्वस्थ मनस्थिती अशापैकी घटना घडणे संभवते. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा. “ओम नम: शिवाय" मंत्राचा दररोज नियमितपणे एक माळ जप करा.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीचा वर्तमान स्वभाव अतिशय लहरी, अस्थिर, अविचारी असा झाला असण्याची शक्यता वाटते. तसे असेल तर हातून विचित्र आचरण घडत असले पाहिजे. अविचाराने नको तो खर्च होत असला पाहिजे. तसेच समोरच्याचा अपमान होईल असे फटकळ बोल मुखावाटे बाहेर पडत असतील. राहूमुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. पण हा राहू दलालीचा व्यवसाय असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या रवि-बुध ग्रहांमुळे या

राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध अतिशय अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याचा उत्तरार्ध काही प्रमाणात अनुकुल होईल; पण सप्तम स्थानातील बुधामुळे दु:ख, भांडणे, वियोग अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी असलेला शनि ग्रह लोखंड-कोळसा असे व्यवसाय असणारांना थोडा अनुकुल होईल; पण इतर व्यावसायिकांच्या व्यवसायात आहे तीच परिस्थिती कायम राहील. काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे योग येतील. नेपच्यूनमुळे काही मंडळीना नैराश्य येईल; तर गुप्त पोलिसांना तसेच मानसोपचार तज्ञाना तो अनुकुल व लाभदायक होईल. लाभस्थानी असलेल्या मंगळामुळे अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट परिश्रम करावे लागतील. तसेच मित्रांशी वितुष्ट येणेही संभवते. पण ह्याच मंगळामुळे काहीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. मीन ही गुरु ग्रहाच्या स्वामित्वाची राशी आहे. म्हणून मन:शांतीसाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयांची आराधना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

=====OOOOO0OOOOO=====